# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./२६४६/२०१८ दि.०६/०८/२०१८

# परिपत्रक

विषय :- शहरी व ग्रामीण भागात महाविद्यालयांमध्ये ऑनलाईन शिकाऊ अनुज्ञप्ती चाचणी घेण्याच्या कार्यपध्दतीत एकसमान धोरण आणण्याच्या हेतुने धोरण निश्चित करणेबाबत.

संदर्भ :- मा. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयीन परिपत्रक क्र. ३३/पआ/का.११/संगणक/एलएलआरटॅब/२०१८/जा.क्र. ११६३०, दिनांक ०२ ऑगष्ट्र २०१८

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ व विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, परिवहन कार्यालयामार्फत शहरी व ग्रामीण भागात महाविद्यालयांमध्ये संगणक/"टॅब बेस" प्रणालीद्वारे शिकाऊ अनुज्ञप्ती ऑनलाईन चाचणी घेऊन शिकाऊ अनुज्ञप्ती ऑनलाईन शिकाऊ अनुज्ञप्ती चाचणी घेण्याच्या कार्यपध्दतीत एकसमानता आणण्याच्या हेतुने धोरण निश्चित करणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने संदर्भीय परिपत्रकाच्या अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आपल्यास्तरावर आवश्यक कार्यवाही घ्यावी. तसेच महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास सादर करावा.

**(डॉ. गो. दा. दुबे)**
**कुलसचिव(प्र.)**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

सहपत्र - संदर्भीय पत्र संलग्नित.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय : -शहरी व ग्रामीण भागात महाविद्यालयांमध्ये ऑनलाईन शिकाऊ अनुज्ञप्ती चाचणी घेण्याच्या कार्यपध्दतीत एकसमान धोरण आणण्याच्या हेतुने धोरण निश्चित करणेबाबत.

**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,**
प्रशासकीय इमारत, ३ रा व ४ था मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ,सरकारी वसाहत
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

**क्रमांक- ३३/पआ/का.११/संगणक/एलएलआरटॅब/२०१८/जा.क्र. 11630 , दिनांक- 2 AUG 2018**

## परिपत्रक

**संदर्भ - या कार्यालयाचे क्र. -१०/पआ/का.११/संगणक/एलएलआरटॅब/२०१७/जा.क्र. १०८६०, दिनांक २०.०७.२०१७ रोजीचे परिपत्रक**

उपरोक्त विषयाच्या संदर्भित परिपत्रकान्वये यापूर्वीच आपणांस परिवहन कार्यालयामार्फत शहरी व ग्रामीण भागात महाविद्यालयांमध्ये संगणक/"टॅब बेस" प्रणालीव्दारे शिकाऊ अनुज्ञप्ती ऑनलाईन चाचणी घेऊन शिकाऊ अनुज्ञप्ती ऑनलाईन शिकाऊ अनुज्ञप्ती चाचणी घेण्याच्या कार्यपध्दतीत एकसमानता आणण्याच्या हेतुने धोरण निश्चित करणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

या संदर्भाने सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना पुनश्च: खालीलप्रमाणे सूचना जारी करण्यात येत आहेत..

**अ. महाविद्यालयांमध्ये धोरणात्मक अटी व शर्ती**

१.महाविद्यालयांमध्ये कॉम्पुटर लॅब असावी त्यात कमीत कमी १० संगणकाच्या जोडणीचा (LAN network) व किमान २ Mbps क्षमतेची जोडणीची तसेच प्रिंटर इ. सुविधा असावी. ज्या महाविद्यालयात सदर अट वगळता अन्य सुविधा उपलब्ध आहेत अशा पात्र कॉलेजात संबंधित प्रा.प.अ/उप प्रा.प.अ टॅब आधारे चाचणीची सुविधा उपलब्ध करु शकतील.

२. शासन मान्यता प्राप्त शिक्षण संस्था असावी.

३. संबंधित महाविद्यालयातील पटावरील विद्यार्थ्यांची चाचणी घेण्यात यावी.

४. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची चाचणीची व्यवस्था महाविद्यालयाने निशुःल्क करावी.

५.चाचणीचे वेळापत्रक परिवहन कार्यालयाच्या मान्यतेने संबधित महाविद्यालयाने तयार करावे.

६.चाचणी देऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांची यादी कॉलेज व्यवस्थापनाने तयार करावी.सर्व अर्जदारांचे अर्ज महाविद्यालयाने परिवहन सेवा या संकेतस्थळावर अपलोड करावे, ऑनलाईन शुल्क भरावे. उमेदवाराचे वय,पत्ता या आवश्यक कागदपत्राच्या अर्जाची छाननी कॉलेज व्यवस्थापनाने करावी.

ब. **प्रादेशिक परिवहन कार्यालयाने करावयाची कार्यवाही.**

१.परिवहन कार्यालय शिबिराची तारीख, वेळ व विद्यार्थ्यांची संख्या इत्यादीस मान्यता देणे.

२.कार्यालय प्रमुखाने शिबीराकरिता, सहाय्यक रोखपाल,मोटार वाहन निरिक्षक, अनुज्ञप्ती वाटप,याबाबतचे नियोजन उपलब्ध असलेल्या कर्मचारी/अधिकारी यानुसार करावे.

३..महाविद्यालयांना यासाठी विशेष वेळ व स्लॉट उपलब्ध करुन देता येईल.

४.प्रत्येक कार्यालय प्रमुखाने अधिकाअधिक महाविद्यालयांमध्ये सदरचे कार्यक्रम करावेत.त्याचवेळी रस्ता सुरक्षेच्या बाबतही जनजागृती करावी.

५.विभागातील कामकाजामध्ये यानिमित्ताने अनधिकृत व्यक्तींचा वावर वाढणार नाही याची दक्षता घ्यावी.सर्व प्रक्रियेत केवळ महाविद्यालयाचे प्राचार्य व स्टाफ यानांच सहभागी करुन घ्यावे.इतर कोणालाही अनुज्ञप्ती प्रक्रियेत सहभागी करु नये..

६..खालील प्रकारची गुगल शीट कार्यालयाने तयार करुन त्यामध्ये अर्जदार महाविद्यालयाने व कार्यालयाने माहिती भरावी.

**Chart - I**

**(To be filled in by Principal of approved Collage)**

| Sr. No. | Name of Collage with address | Name, designation & Contact details of contact person | Available Computer Terminals (Nos) with LAN & Internet | No of Students Appearing for the test |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |

**Chart - II**

**(To be filled in by the Regional/Dy Regional Transport Office)**

| Sr. No | Dates allotted for the test (Select date). | Incharge IMV posted for Camp |
|---|---|---|
| 1 | | |
| 2 | | |
| 3 | | |

**Chart - III**

| Report of test(To be filled in by the Regional/Dy Regional Transport Office) | | | | |
|---|---|---|---|---|
| Name of Collage :<br>Officer on duty : | | Date of Test : | | |
| Sr. No. | Name of Student | Pass | Fail | Total |
| | | | | |

सर्व प्रादेशिक परिवहन/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील विद्यापिठाच्या कुलगुरु (Vice Chancellor ) यांचेसोबत बैठक घेऊन सदर योजने संदर्भात त्यास अवगत करावे व त्यांच्या मदतीने सदर योजनेचे कार्यान्वयन करावे. तसेच सर्व प्रक्रियेत केवळ महाविद्यालयांचे प्राचार्य व स्टाफ यानांच सहभागी करुन घ्यावे. तसेच महाविद्यालयातील/महाविद्यालयांव्यतिरित अन्यत्र कोणत्याही ठिकाणी कोणत्याही व्यक्ती/संस्था यांच्या विनंतीवरुन सदर सुविधा उपलब्ध करुन देवू नये.

शेखर चन्ने
परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य मुंबई.

प्रत:- १. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/उप प्रादशिक परिवहन अधिकारी यांना कार्यवाहीस्तव.
२ सर्व नियंत्रक अधिकारी., परिवहन आयुक्त कार्यालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्त्व.
३. सर्व विद्यापिटाचे कुलगुरु यांना माहितीस्तव.
४. कार्यालयीन आदेश नोंद वही